सं.फौ.प्र.क्र.१००५/२०२३
सरकार -वि.- प्रकाश पवार
**निशाणी क्र.०९ खाली**

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक १ याची जबानी</u>**

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,
नांव – पो.हे.कॉ. सचिन अरूण पाटील.
वय - ४२ वर्षे, व्यवसाय – नोकरी,
रा.- मलकापुर शहर पोलीस स्टेशन, मलकापुर जि. बुलडाणा.

**<u>सरतपास- सरकारी अभियोक्ता श्री.आर.बी. देवराज यांचेमार्फत शपथेवर सुरु....</u>**

०१. दि.२७.०९.२०२३ रोजी मी पोलीस स्टेशन मलकापुर शहर येथे पोलीस हेड.कॉन्स्टेबल या पदावर कार्यरत असतांना वरिष्ठांच्या आदेशावरून मी व होमगार्ड शहा असे ग्रामीण बिटमध्ये पेट्रोलिंग करीत असतांना अशी माहीती मिळाली की, घिर्णी येथे दाताळा येथे जाणा-या रोडवर आरोपी हा सार्वजनिक ठिकाणी विनापरवाना देशी दारू बाळगून विक्री करत आहे. अशा माहीतीवरून आम्ही घटनास्थळी गेलो व त्याबाबत दोन पंचांना माहीती दिली. दाताळा येथे गेले असता एक इसम हा आम्हाला उभा दिसला. तेथे गेल्यावर आमची खात्री झाल्यामुळे छापा टाकून त्याला पकडले. त्याच्याजवळ असलेली थैली तपासली असता त्यातून देशी दारू संत्रा ५००० कंपनीच्या १८० मीली लिटरच्या प्रत्येकी १२ सीलबंद बाटल्या मिळून आल्या. त्याबाबत त्याच्याकडे परवान्याची चौकशी केली असता त्याच्याकडे परवाना नसल्याचे सांगितले. त्यानंतर त्यातील एक बाटली ही सी.ए. परिक्षणाच्या अहवालाकरिता वेगळी काढून घेतली व त्याला सिलबंद करुन पंचनामा तयार करण्यात आला. आता मला जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी, दोन पंचांची व आरोपीची सही असून त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>निशाणी क्र.११</u>** देण्यात आला. त्यांनतर आरोपीला मुद्देमालासह पोलीस स्टेशन येथे आणले व त्याच्याविरुध्द फिर्याद दिली. आता मला ती फिर्याद दाखविण्यात आली. त्यावर माझी सही असून त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>निशाणी क्र.१२</u>** देण्यात आला. आता मला छापील प्रथम खबरी अहवाल दाखविण्यात आला. त्यावर माझी सही असून त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>निशाणी क्र.१३</u>** देण्यात आला. जप्त करण्यात आलेला मुद्देमाल हा मालखाण्यात जमा केला. आता मला मुद्देमाल पावती दाखविण्यात आली. त्यावर माझी व पोलीस निरीक्षक साहेब यांची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>निशाणी क्र.१४</u>** देण्यात येतो. सदर

गुन्हयाचा तपास मी केला असून तपासादरम्यान मी साक्षीदारांचे बयाण नोंदवले व आरोपीला सुचनापत्रावर सोडले. सदर प्रकरणात सी.ए. अहवाल प्राप्त झाला असून आता मला तो दाखविण्यात आला. त्यास **निशाणी क्र.१५** देण्यात येतो. आरोपीविरुध्द पुरावा मिळून आल्याने त्याच्याविरुध्द दोषारोप दाखल केले. मी आरोपीला ओळखतो. तो आज न्यायालयात हजर नाही.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास- आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.आर.एम.निकम यांचेमार्फत सुरु..**

०२. आम्हाला वरिष्ठांनी तोंडी आदेश दिले होते. या प्रकरणात स्टाफ व पंचाव्यतिरिक्त इतर कोणत्याही साक्षीदाराचे बयाण नोंदवलेले नाही. साक्षीदार परत स्वतःहून सांगतो की, या केसमध्ये इतर दुसरे कोणतेही साक्षीदार नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, वरिष्ठांच्या सांगण्यावरून मी आरोपीविरुध्द खोटी फिर्याद दाखल केली, आरोपीच्या ताब्यातून दारू जप्त केली नाही, सदर गुन्हयाचा तपास करुन खोटे दोषारोपत्र दाखल केले व आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by PARAG SATISH THAKARE
Date: 2026.01.02 05:59:20 +0530

| | |
|---|---|
| दिनांक :०२/०१/२०२६. | **(पी.एस.ठाकरे)**<br>न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,<br>(न्यायालय क्र.१), मलकापूर |